स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.
दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.को.वि.मं./लेखा/2021-22/103
कोल्हापूर 416301
दिनांक - 12 JUL 2022

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये / माध्यमिक शाळा,
जिल्हा सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय - फेब्रुवारी / मार्च 2022 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेमध्ये नियामक/परीक्षक म्हणून नियुक्त केलेल्या शिक्षकांचे पारिश्रमिक मानधन व प्रवास खर्च (Remunaration & Travalling Bill) देयकाची मंजूर रक्कम त्यांच्या बँक खातेवर जमा केले बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पूणे यांचे अंतर्गत कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर या विभागीय मंडळाकडून फेब्रुवारी/मार्च 2022 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेमध्ये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील / माध्यमिक शाळेतील ज्या शिक्षकांची नियुक्ती नियामक/परीक्षक म्हणून करण्यात आली होती त्यांचे पारिश्रमिक मानधन व प्रवास खर्च (Remunaration & Travalling Bill) देयके तपासण्याची प्रक्रीया पूर्ण झाली असून देयकाची मंजूर देय रक्कम परीक्षक/नियामकयांनी मंडळास कळविलेल्या बँक खात्यावर NEFT/RTGS ने अदा करण्याची कार्यवाही सूरू असून संबंधितांना खात्यावर रक्कम जमा झालेची खात्री करणेस कळवावे. राष्ट्रीयकृत बँकसोडून अन्य बँक खात्यावर रक्कम जमा होण्यास अवधी लागू शकतो. याची ही नोंद घ्यावी. रक्कम जमा होण्याबाबत काही शंका असल्यास किंवा इतर अडचणी असल्यास त्वरीत या कार्यालयाच्या लेखा शाखेशी संपर्क साधावा.

मुंबई वित्तीय नियमावली नियम 1958 39 (अ) (ग) तसेच महाकोषागार नियमावली 1968 नियम 151 (1) व तदर्थ समिती दिनांक 25/07/2018 ठराव क्रमांक 48 नुसार मुदतीनंतर देयकाबाबत निवेदने/तक्रारींचा विचार केला जाणार नाही. याबाबत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील / माध्यमिक शाळांतील संबंधित शिक्षकांना आपणामार्फत सुचित करण्यात यावे.

(दत्तात्रय पोवार)
प्र. विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत कार्यवाहीस्त व माहितिस्तव,

1. मा. शिक्षण उपसंचालक (माध्यिमिक), कोल्हापूर विभाग
2. शिक्षणाधिकारी, जिल्हा सातारा / सांगली / कोल्हापूर

फेब्रुवारी / मार्च 2022 च्या माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेमध्ये नियामक/परीक्षक म्हणून नियुक्त केलेल्या शिक्षकांचे पारिश्रमिक मानधन व प्रवास खर्च (Remunaration & Travalling Bill) देयकाची मंजूर रक्कम त्यांच्या बँक खातेवर जमा केले बाबत संबंधितास आपणामार्फत कळविण्यात यावे.

प्रत सविनय सादर,
मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पूणे